**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७९/२०१३ मधील नि.क्र.१३६ वरील आदेश</u>**
**<u>(भाऊसाहेब त्रिभुवन वि. शामलता त्रिभुवन वगैरे)</u>**

**१.** वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर ताकीद मनाई हुकूम व सरस निरस मानाने वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. तसेच प्रतिवादी नं.९ यांनी निशाणी २९ अन्वये जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रतीदावा दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.९ अशोक अनंत त्रिभुवन यांनी दाखल केलेला आहे. वादीने स्वत: अगर त्यांचे मार्फत इसम यांनी वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.९ यांचे वाद मिळकतीचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळे करू नये, दाव्याचा निकाल होईपावेतो दावा मिळकतीत प्रवेश करून कोणतेही प्रकारे मेहनत मशागत करू नये, मिळकतीमध्ये बदल फेरबदल होतील, मिळकत विक्री विल्हेवाट लावून जडजोखमीत गुंतविला जाईल असे स्वरूपाचे कृत्य करू नये यासाठी मनाई हुकूम मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी नं.९ चे असे कथन आहे की, दावा मिळकत १अ म्हणून नमूद केलेली मिळकत गट नं.३९ चा जुना स.नं.१०/१ क्षेत्र १ हे. ०४ आर. तसेच दावा मिळकत १ब म्हणून नमूद केलेली मिळकत गट नं.३५ चा जुना स.नं. १०/३ हयाच जमीनीमध्ये मुळ पुरूष तात्या याचा मुलगा भिवा याचेमार्फत वादी भावका उर्फ भाऊसाहेब भिवाजी त्रिभुवन वगैरे यांचा १/२ हिस्सा आहे व या प्रतिवादी नं.९ याचे मुळ पुरूष भागाजी यांचे वारसदारांचा १/२ हिस्सा आहे. मात्र दावा कॉलम १ मध्ये नमूद मिळकत १ क याचा जुना स.नं. ६०/२ हयामध्ये वादी यांचे पुर्व हक्कदार असणारे ‘तात्या’ यांचा काहीएक हक्क अधिकार हितसंबंध हिस्सा नाही. सदर गट नं.१६९, क्षेत्र ० हे. ८२ आर. ही मुळ पुरूष भागाजी यांचेमार्फत या प्रतिवादी नं.९ वगैरे यांचे एकटयाचे मालकी हक्क अधिकार हिश्याची मिळकत आहे व त्याप्रमाणे सन १९३० सालापासूनचे रेकॉर्डवर तशा नोंदी आहेत.

**३.** वरीलप्रमाणे परिस्थिती असतांना सत्य परिस्थिती मा. न्यायालयासमोर येणे गरजेचे असल्याने व वादी यांनी दावा दाखल करतांना खोटे खोडसाळपणे मे. कोर्टाची दिशाभुल करणेसाठी फेरफार नं.६१६८ असा नमूद केला होता. त्यामुळे या प्रतिवादी नं.९ यांनी ज्ञानानुसार सदरचा फेरफार उतारा वादी यांनी दाव्यात हजर करावा म्हणून (प्रॉडक्शन ऑफ डॉक्युमेंट) ची मागणी केली होती. तथापि आता वादीने त्यांची चूक दुरूस्ती अर्ज निशाणी ११७ याद्वारे केल्याने सदरचा वाद राहिला नाही.

**४.** वरील नमूद परिस्थितीत वादी हे या प्रतिवादी यांना सुखासुखी न्याय मिळू नये व प्रकरण वर्षानुवर्षे प्रलंबित राहून मिळकतीबाबत वेगवेगळया हरकती कृत्ये करता यावीत व

एकटयास उत्पन्न खाता येवून उत्पन्नाची अफरातफर करता यावी यासाठी कोर्ट प्रोसिजरचा दुरूपयोग व गैरवापर करत आहेत. वादी यांनी दाव्यात कोणत्याही योग्य संयुक्तिक व उचित कायदेशीर कारणांशिवाय ४० इसमांना पक्षकार केले आहे. ते पाहता त्यांचे हक्क हितसंबंध पहाता व वादी यांनी त्यांचेवर समन्स बजावणी बाबतची केलेली चालढकल, टाळाटाळ पहाता सदरचे प्रतिवादी यांचे विरूध्दचा वादी यांचा दावा तातडीने रदद् होणे क्रमप्राप्त आहे. वादी यांची एकटयाची वाद मिळकतीची मालकी व वहिवाट नाही.

**५.** वादी हे प्रतिवादी नं.९ यांचे गट नं.१६९ चे वाग वहिवाटीस दावा प्रलंबित असल्याचा गैरफायदा घेवून हरकत अडथळे करीत आहेत. दावा मिळकत गट नं.१६९ ही मिळकत प्रतिवादी नं.९ यांचे स्वतंत्र मालकीची असून त्यामध्ये पेरणी व शेतीविषयक कामे करणे गरजेचे झाले आहे. या प्रतिवादी यांचे वाग वहिवाटीचे हक्कांत बाधा आल्यास प्रतिवादी नं.९ यांचे कधीही व कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. करीता प्रतिवादी नं.९ ने प्रस्तुतचा मनाई हुकूमाचा अर्ज दाखल केला आहे.

**६.** वादीने मनाई हुकूमाचे अर्जावर लेखी म्हणणे देवून अर्जाला विरोध केला. त्यांनी अर्जातील संपुर्ण कथन नाकारले. वादीच्या म्हणण्याप्रमाणे अर्ज खोटा आहे. वादीचा ताबा व कब्जा दावा मिळकतीवर मागील ५० ते ६० वर्षापासून वडीलोपार्जित स्वरूपात आहे. प्रतिवादी नं.९ यांनी यापुर्वी रे.मु.नं. ३०४/०१ हा दावा या मिळकती सरस निरस मानाने वाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला असून तो DID झालेला आहे. पुन्हा या दाव्यात नवीन क्लेम मागणी करुन दावा मिळकतीशी वादीचा काहीएक संबंध नाही अशा स्वरूपाचा जाहीर ठराव मागणी केली असून ती एकमेकांशी सुसंगत नाही. प्रतिवादी हे वस्तूस्थिती लपवून ठेवून खोटे अर्ज वारंवार करत आहेत. सबब, अर्जातील मागणी फेटाळण्यात यावी अशी मागणी केली आहे.

**७.** दोन्ही पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांवरुन प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे विचारार्थ येतात. त्यावर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले ते खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी नं.९ च्या हक्कामध्ये सकृतदर्शनी प्रकरण आहे का ? | ... अंशतः होय |
| २. | न्यायाचा समतोल प्रतिवादी नं.९ च्या बाजुने आहे का ? | ... अंशतः होय |
| ३. | अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादी नं.९ चे अपरिमित नुकसान होणार आहे का ? | ... अंशतः होय |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ करीता</u>** :-

८. दोन्ही बाजुंचा प्रदिर्घ युक्तिवाद ऐकला. तसेच प्रतिवादी नं.९ यांनी निशाणी १३९ वर लेखी युक्तीवाद सादर केला आहे तर वादीने निशाणी १४० वर लेखी युक्तीवाद सादर केला आहे. सदर लेखी युक्तीवादाचे बारकाईने अवलोकन केले.

९. वादीचे वतीने असा युक्तीवाद करण्यात आला की, दावा मिळकतीपैकी १क गट नं.१६९ ही मिळकत इनाम वर्ग ६ब ची असून फेरफार नं. ६१६७ अन्वये आप्पाजी भागाजी, अमृत भागाजी व अनंता भागाजी यांच्या नावे एकत्र कुटूंबदारीकरीता सरकार शेरा कायम ठेवून सरकारने अदा केलेले आहे. तसेच दाव्यात दाखल केलेले सातबारा उतारे हे गट नं.३५ व ३९ मध्ये वादी व सहहिस्सेदार यांची नावे आहेत. त्याचप्रमाणे गट नं.१६९ मध्ये वादीचे चुलत आजोबा व दुसरे चुलत आजोबांची मुलगी ज्योत्स्ना तसेच तिसरा चुलत आजोबा आप्पाजी यांच्या नावे रेकॉर्ड ऑफ राईटला वादीचा हिस्सा होता व आहे. परंतू रेकॉर्ड ऑफ राईटला मुळ खातेदारांची नावे आस्तित्वात आहेत. वादीचा दावा मिळकतीत ताबा, वहिवाट व कब्जा वादीचे आजोबा हेच करत होते. त्यांच्या मृत्यूनंतर वादीचे वडील भिवाजी सदर मिळकतीत मेहनत मशागत करून उत्पन्न घेत आलेले आहेत. त्यामुळे वादीचा वडीलोपार्जित ताबा सदर मिळकतीत असल्याने प्रतिवादी नं.९ यांनी सदर १क मिळकतीत पीके करण्याबाबत हिल्ला हरकती केल्याची मागणी खोटी आहे.

१०. तसेच वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी नं.९ ने यापुर्वी निशाणी ६३ वर अशा स्वरूपाचा मनाई अर्ज दाखल केला होता परंतु तो स्वत:हून दाव्यासोबत चालविण्याची मागणी केली होती. प्रतिवादी नं.९ याने यापुर्वी दावा मिळकती संदर्भात कोपरगांव न्यायालयात रे.मु.नं. ३४०/२००१ नवीन रे.मु.नं.३८७/२००४ हा वादी व अन्य प्रतिवादी यांच्याविरूध्द वाटपासाठी दाखल केला असून तो दिनांक ८/१०/२०१३ रोजी DID झालेला आहे. प्रस्तुत दाव्यात वादीने निशाणी १३८ अन्वये दैनिक सार्वमत मधील दिनांक ८/७/२०१९ रोजीची जाहीर नोटीस दाखल केलेली आहे. त्यानंतर देखील प्रतिवादी नं.६,१३,१४ व २४ दाव्याकामी हजर राहिलेले नाहीत. प्रतिवादी नं.२ ते ८ व १० ते ४० यांची नावे प्रस्तुत दाव्यातून **निशाणी १२६ व १३१** वरील आदेशान्वये वगळण्यात आलेली आहेत.

११. प्रतिवादी नं.९ यांच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे का हे पहाण्यासाठी अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादीने वाटप होवून मिळण्यासाठी केलेला असून प्रतिवादी नं.९ यांनी निशाणी २९ अन्वये प्रतीदावा

केलेला आहे. प्रस्तुतचा प्रतीदावा हा जाहीर ठराव व अतिक्रमण दुर होवून मिळण्यासाठी केलेला आहे.

**१२.** प्रस्तुतचा दावा वादीने एकत्र हिंदू कुटूंबादारीच्या मिळकती संदर्भात केलेला असून वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांना महार वतन हाडोळा जमीनी सर्व्हीस इनाम वर्ग-६ब प्रमाणे देण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर महार वतन नष्ट करून नवीन शर्तीने मिळकती देण्यात आल्या. त्याबदद्ल सरकारी हुकूम झाला व त्याचा फेर नंबर ६१६७ असा झाला आहे. प्रतिवादी नं.९ यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरून सन १९३० सालच्या सुमारास प्रतिवादी व वादी यांचे मुळ पुरुष बाळाजी यांना दोन पुत्र नामे भागाजी, बाळा व तात्या बाळा असे होते. सदर महार वतन हाडोळाची मिळकत ही त्यांना स्वतंत्रपणे देण्यात आलेली होती. प्रतिवादी नं.९ हे भागा बाळा यांचे हक्कदार आहेत. त्यानुसार नवीन गट नं.१६९, फेरफार नं.६१६७ हा फक्त प्रतिवादी नं.९ यांचे पुर्वहक्कदार आप्पा, अमृता व आनंदा भागा यांना देण्यात आलेले आहेत. सदरची मिळकत आप्पा भागा यांच्या नावे रिग्रॅट झालेली आहे. त्याबाबतचा फेरफार नं.७ हा अभिलेखावर दाखल केलेला आहे. तसेच नवीन शर्तीने सरकारी आदेशाप्रमाणे जमीनीची खरेदी रक्कम देखील भरलेली आहे.

**१३.** प्रस्तुत दाव्यातील दाखल कागदपत्रे फेरफार नं.६१६७, फेरफार नं.१ व ७, सात बारा उतारे, खाते फोड पत्रके व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, गट नं.१६९ हा महार वतन हाडोळा जमीन सर्व्हीस इनाम वर्ग ६ब प्रमाणे प्रतिवादी नं.९ यांचे पुर्वहक्कदार यांच्या नावे आल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी नं.९ यांचे सदर मिळकतीवर अन्यवर्जी कब्जा आहे असे दिसून येते. तसेच सात बारा सदरी प्रतिवादी नं.२ ते ८ व १० ते ४० यांची नावे नमूद नसून त्यांचे पुर्वहक्कदार यांची नावे रेकॉर्ड ऑफ राईटला आहेत.

**१४.** प्रतिवादी नं.९ यांनी अभिलेखावर दिनांक ३०/७/१९६२ रोजीचे महार वतन नष्ट करण्याबाबतचे हक्कपत्र दाखल केले आहे. त्यानुसार कब्जेदार सदरी सरकार असे नाव दाखल झालेले आहे. त्यानंतर प्रतिवादी नं.९ यांनी दिनांक २१/११/१९७४ रोजीचे अधिकार अभिलेख महार वतन इनाम वर्ग ६ब या जमीनीची कब्जा हक्काची तीन पट आकाराने रक्कम भरल्याचा अभिलेख दाखल केलेला आहे. यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी नं.९ यांच्या कब्जात गट नं.१६९ फेरफार नं.६१६७ अन्वये आलेला आहे. प्रतिवादी नं.९ याने प्रतीदाव्यातील मिळकतीबाबत मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे. परंतु वरील विवेचनावरून गट नं.१६९ वगळता उर्वरित दोन मिळकती या एकत्र कुटूंबदारीच्या असून त्याबाबत सहहिस्सेदारांविरूध्द मनाई हुकूम देणे न्यायोचित होणार नाही. मात्र प्रतिवादी नं.९ ने गट नं.१६९ ही मिळकत त्याच्या

हिश्यास आल्याची बाब शाबीत केलेली असल्याने प्रतिवादी नं.९ यास केवळ गट नं.१६९ बाबत मनाई हुकूम देणे न्यायोचित होईल.

**१५.** यावरून असे स्पष्ट होते की, प्रतिवादी नं.९ यांच्या बाजूने सकृत दर्शनी केस असून न्यायाचा समतोल देखील त्यांच्या बाजूने आहे. वादीकडून प्रतिवादी नं.९ यांना गट नं.१६९ मध्ये हरकती चालू राहिल्यास प्रतिवादी नं.९ चे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. उलटपक्षी वादीचे कोणतेही अपरिमित असे नुकसान होणार नाही. म्हणुन विचाराधीन मुद्दयांचे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आ दे श**

१. अर्ज निशाणी क्रमांक १३६ अंशत: मंजुर करण्यात येतो.

२. वादीने स्वत: अगर त्यांचेमार्फत इसम यांनी वाद मिळकत गट नं.१६९ मधील प्रतिवादी नं.९ यांचे शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत अडथळे करू नये, दाव्याचा निकाल होईपावेतो दावा मिळकतीत प्रवेश करून कोणतेही प्रकारे मेहनत मशागत करू नये, मिळकतीमध्ये बदल फेरबदल होतील, मिळकत विक्री विल्हेवाट लावून जडजोखमीत गुंतविला जाईल असे स्वरूपाचे कृत्य करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येत आहे.

३. उक्त अर्जाचा खर्च अंतिम निकालानंतर होणाऱ्या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घ्यावा.

(सै. वै.अ. लावंड-कोकाटे)
३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
राहाता

दिनांक :- ०७/१२/२०२०